# चक्रवाक - विजया बापट

आज अचानकच शाळेत संस्कृतच्या वर्गात असताना शिकलेल्या एका मिथ्थकाची तिला आठवण झाली. दोन पक्षी कमलदलाच्या दोन बाजूस बसून एकमेकांना आतुरतेने हाक घालत असतात. कमल पत्र मध्ये असल्याने त्यांची हाक एकमेकां पर्यंत पोहचू शकत नाही. चक्राकार वळण घेत त्यांच्या हाका त्याच्यांकडेच परतून येत असतात. बराच वेळ त्यांच्या आर्त हाकांची आवर्तने सुरूच असतात. -त्या चक्राकार हाकांमुळे त्यांचे नाव चक्रवाक असे पडले आहे. - शेवटी आपण ज्याच्याशी संवाद साधू पहात आहोत तो भागीदार आपल्या हाकांस प्रतिसाद देत नाही असो वाटून , थकून उदासीन होऊन दोन्ही पक्षी दोन दिशांनी उडून निघून जातात असे ते मिथ्थक आहे.

अनेक वर्षांपूर्वी वाचलेल्या ह्या मिथ्थकाची आज तिला आठवण होण्याचे कारणही तसेच होते.

तिचा आजचा सारा दिवस तान्हया बाळांसाठी असलेल्या अतिदक्ष विभागात ( न्यूबॉर्न इन्टेंसिव्ह केयर युनिट) त्या बाळाच्या शुषुत्रेत गेला होता. त्या इवल्याश्या जीवाची जगण्यासाठी चाललेली धडपड पाहून तिचे काळीज हेलावत होते. स्वतःची काहीही चूक नसताना तो अभागी जीव अश्या यातना भोगत होता.. कधी त्याच्या हृदयाचे ठोके नियमितपणे चालत नव्हते तर कधी मज्जातंतू उद्दीपित होऊन त्याला आकडीचे ( seizure ) अथक झटके येत होते. इवलासा जीव त्याच्या शी टक्कर दे ण्याचा प्रयत्न करीत होता. मधूनच यकृत आपल्या स्वतःस झालेल्या इजेची आठवण करून देत होते. ह्या साऱ्या दिव्यातून जात असतानाच त्याला पुरेशी पोषक द्रव्ये मिळत आहेत हे पाहणे देखील गरजेचे होते. सुदैवाने हल्ली उपलब्ध असलेल्या अत्यानुधिक वैद्यकीय सुविधा व उपचारपद्धती मुळे त्याला मदत मिळत होती. तरीदेखील शमभरावर छिद्रे असलेल्या गळक्या छपराशी चार बादल्या घेऊन सामना करावा तसेच चालले होते डॉक्टर व नर्सेसचे प्रयत्न. सारेजण थकत चालले होते. तरीसुद्धा त्या बाळाची जगण्याची जिद्द त्यांना उभारी येण्यास मदत करीत होती.

ती देखील ह्या साऱ्या सेवक वर्गाचा भाग होती. निकडीचे सारे वैद्यकीय प्रयत्न करीत असतानाच तिचे मन , हा बाळ बरा होऊ दे , त्याच्या शरीराला जरा तरी शांती मिळू दे विकारांशी झगडण्यासाठी त्याला बळ मिळू दे असा धावा करीत होते. बाळाचा आजार त्याच्या यातना सारे काही टाळण्यासारखे होते नव्हे, टाळायला हवेच होते हि जाणीव मनाला बेचैन करीत होती. इतरांच्या चुकांचे फळ बाळाला का भोगावे लागत आहे हा उत्तर नसलेला प्रश्न मन विचारीत होते.

बाळाला जरा बरो वाटले कि तो अवधी डॉक्टर्स आणि नर्सेस थोडे चहा पाणी व क्षुधाशांती ह्यात घालवत होते. क्षुधाशांती म्हणायची पण मन मात्र शांत होत नव्हते. हजारो प्रश्न मनात पिंगा घालत होते. त्याच्या आईला गर्भारपणात देखील मादक द्रव्य सेवनावर आळा का घालता आला नाही? तिला बाळाची काळजी वाटली नाही का? निदान तिने स्वतःसाठी तरी वेळेवर वैद्यकीय मदत का घेतली नाही? वैद्यकीय व्यवस्था म्हणावी तेवढी रुग्णाकडे आस्थेने पाहणारी नाही हे खरंय परंतु निदान आणीबाणी च्या प्रसंगी तरी ती उपलब्ध असते. का तिने त्याचा फायदा घेतला नाही? हि व्यवस्था अधिक परिणामकारक करण्यासाठी काय करायला हवे? अनेक प्रश्न मनात घोंगावत होते. ह्या अवाढव्य वैद्यकीय व्यवस्थेतील आपण केवळ एक लहानसा भाग आहोत हि जाणीव देखील मानस बोचत होती. आपण काय करावे, काय करू शकतो ह्याची यादी मनात घोळत होती आणि स्वतःच्या मर्यादा लक्षात यऊन मन पुन्हा पुन्हा त्रस्त होत होते.

मनःशांती ढळण्यात आणखी एका जाणिवेचा वाटा होता.

हे बाळ गेली तीस दिवस दवाखान्यात होते. पहिले तीनचार दिवस सोडल्यास त्याचे वडील तर सोडाच पण त्याची आई दोखील दवाखान्यात फिरकली नव्हती . बाळ कसे आहे ह्याची कोणी साधी चौकशी देखील केली नव्हती. सेवकवर्गापैकी कुणालाच त्यांच्या उपेक्षेचा अर्थ कळत नव्हता. प्रत्यक्ष आईवडील एवढे निष्टुर, इतके निष्काळजी कसे असू शकतात ? उत्तर सापडत नव्हते . स्वतःचे व इतर आपल्या भोवतालातील मित्रमैत्रिणींचे आईवडील , त्यांचे वागणे डोळ्यासमोर येत होते. खेळताना मूल पडले , त्याला जरासे खरचटले तर बेचैन होणारे आईवडील ,मुलाला ताप आला, काही आजार झाला तर त्याच्या उशाशी बसून राहणारे ते आईवडील, त्या चित्राचा आणि ह्या चित्राचा मेळ बसत नव्हता.

दिवस जात होते. बाळ अजून दवाखान्यातच होता. आशेचा किरण एवढाच कि मुंगी च्या गतीने का होईना , त्याची तब्येत सुधारत होती.

अशाच एका संध्याकाळी दिवसभराचे काम आटोपून , अतिदक्ष विभागातील साऱ्या रुग्णांची काळजी घेऊन , थकूनभागून जरा उशीरानेच ती घरी जायला निघाली होती. लहान होत जाणारे ,हिवाळ्याचे दिवस होते. सूर्य कधीच क्षितिजा पलीकडे गेला होता. जणू काही तो देखील थकूनभागून विश्रांती घेण्यासाठी निघून गेला होता. आकाश धूसर, धूम्रवर्णीय झाले होते. हिवाळ्यात लवकर लागणारे रस्त्यावरील दिवे अंधाराला अधिकच गडद करीत होते. दवाखान्याचे दार मागे टाकून ती पार्किंग साठी असलेल्या जागेवर ठेवलेल्या आपल्या मोटारी कडे निघाली होती.

दवाखान्याच्या दारा समोरील कट्ट्यावर एक धूसर आकृती बसलेली दिसत होती. क्षणभर ती चमकली. कोण असेल बरे? दवाखान्यातील पहारेकऱ्यास बरोबर चलण्यासाठी बोलवावे का? अधूनमधून दवाखान्याच्या आसपास भुरटे चोर भटकत असत. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांस लुबाडणे, विशेषतः बायकांच्या पर्सेस ओढून पळून जाणे, अशा गोष्टी घडत असत. कधी मादक द्रव्याच्या शोधात असलेले लोक तेथे भटकत असत. त्यांचा कर्मचाऱ्यांस उपद्रव होत असे. 'तुम्हाला कधीही शंका आली , भीती वाटली तर निशन्क पा ह रेकऱ्यास बरोबर घेऊन आपल्या कार कडे जा' असे व्यवस्थापकांनी वेळोवेळी बजावले होते. तिने पुन्हा त्या आकृतीकडे निरखून पहिले. लहानखोर किरकोळ अंगयष्टी असलेली ती आकृती उपद्रवी असेल असे तिला वाटले नाही. काळजीपूर्वक ती ने पुढे पाऊले टाकावयास सुरुवात केली.

"डॉक्टर " ती आकृती तिचयाशीच बोलायचा प्रयत्न करीत होती. आवाज किंचितसा दबलेला बोलू का नको ह्या भ्रमात असलेला वाटत होता. गडद रंगाचे ढगळ हिवाळी कपडे तिच्या अंगावर असल्याने तिचे रेखांकन नीटपणे करता येत नव्हते. ती दोन पाऊले आणखी पुढे सरकली.

" डॉक्टर " आकृतीने पुन्हा हाक घातली. त्यांच्यातील अंतर जरा कमी झाले होते. ती एक स्त्री असल्याचे आता स्पष्ट होत होते.

" डॉक्टर माझे बाळ कसा आहे हो? बरा होईल ना तो ? त्याला अजून देखील खूप त्रास होतोय का? आकृतीने प्रश्नांचा भडीमार केला. एका दमात तिला सारे बोलून टाकायची घाई झालेली जाणवत होती.

कुठे बरं ऐकलाय हा आवाज? आणि मग तिच्या मनात आले; हि त्या बाळाची आई तर नव्हे?

" नाव काय तुझे? आणि तुझ्या बाळाचे? जन्मतारीख काय त्याची? कधी आला तो ह्या दवाखान्यात? कोणत्या विभागात आहे तो? खुंटा बळकट करून घेण्यासाठी तिने अनेक प्रश्न विचारले. हि स्त्री त्या बाळाची आई असल्याची खात्री होताच नकळत तिच्या तोंडून तुटकपणे शब्द बाहेर पडले; " बाळाची एवढी काळजी वाटतेय तर इतके दिवस त्याला बघायला का आली नाहीस? केवळ मला पाहिल्यावर नुसते प्रश्न का विचारते आहेस/"

तोंडातून शब्द बाहेर पडले अन् लगेचच आपले उत्तर आपल्या पेशास न शोभणारे असल्याचे तिच्या लक्षात आले, बाळाचे हाल, त्या हालाचे कारण, त्याची आईवडिलांनी केलेली अवहेलना , त्याबद्दल तिला वाटत असलेले दुःख , सारे तिच्या उत्तरातून व्यक्त झाले होते. तरीही आपले उत्तर योग्य नसल्याची तीव्र जाणीव देखील तिला लगेच झाली. पश्चाताप झाला तीला. पण शब्द तोंडातून निघून गेले होते . . भावनांनी विवेकावर मात केली होती. त्यातून कसे सावरावे ह्या विचारात

ती असतानाच , आई म्हणाली, " डॉक्टर , तुम्ही माझ्यावर रागावलात ते योग्यच आहे. पण मला बाळाची खरंच खूप काळजी वाटतेय. तो बरा होऊ दे म्हणून मी रोज देवापाशी प्रार्थना करतेय. पहिले काही दिवस मी दवाखान्यात त्याला बघायला येत होते. त्याला होणारा त्रास मी पहिला. त्याच्या आजाराचे स्वरूप, त्याचे कारण तुम्हा साऱ्यांनी मला समजावून सांगितले आपल्यामुळे त्याला हा त्रास होतोय हे लक्षात येताच मी हवालदील झाले. पायाखालची जमीन सरकली माझ्या. मला वाटले होते कि माझ्या पोटात असल्याने बाळ सुरक्षित आहे. मादक द्रव्ये त्याच्या रक्तात, माझ्या शरीरातून जातील हे माहित नव्हते मला. आपल्यामुळे त्याला हा आजार झालाय अन् कदाचित तो यातून बाहेर पडणार नाही हा विचार पेलवला नाही मला .
दुःखाने भारावून मी दवाखान्यातून बाहेर पडले . आणि वाट धरली ती मला माहित असलेल्या एकाच रस्त्याची. मादक द्रव्य पुरविणाऱ्या व्यतीच्या दाराची. दुसरा उपायच माहित नव्हता मला. त्या व्यक्तीने आनंदाने मला पुन्हा नशिली द्रव्ये पुरविली. अर्थातच त्याची किंमत मोजून. असे काही दिवस चालले होते . शुद्ध आली कि मी दवाखान्यात येई आणि बाळाचे हाल पाहताच दुःखाने चूर होऊन पुन्हा मादक द्रव्याची कास धरी .

डॉक्टर , ह्या द्रव्याच्या नशेच्या कचाट्यातून सुटणे सोपे नाही. पण बाळासाठी मी प्रयत्न करीत आहे. त्याची अवस्था पाहून पुन्हा नशेची कास धरायला लागू नये म्हणून मी आत येत नाही. रोज तासभर ह्या कट्यावर बसून मी बाळ बारा होऊ दे म्हणून त्याच्यासाठी आणि त्याची काळजी घेणाऱ्या तुम्हा सर्वांसाठी प्रार्थना करते. डॉक्टर ,बरा होईल ना माझा बाळ? ऐकेल ना देव माझी प्रार्थना? "

ती अवाक झाली. काय कल्पना केली होती ह्या आईबद्दल तिने ? पश्तापाशिवाय अजूनही कितीतरी विचार घोळत होते तिच्या मनात .ह्या आईने तिला आज नवीन दृष्टी दिली होती. केवळ रुग्णाकडेच नव्हे तर त्याच्या भोवतेलच्या नातेवाईकांकडे त्याच्या जगाकडे बघायला शिकवले होते तिने तिला.. वैद्यकीय पुस्तकात न लिहिलेला धडा शिकविला होता तिने आज. वेष्टनावरून पुस्तकाबद्दल अंदाज बंधू नका म्हणून वाचले होते तीने . आज त्या वाक्या चा खरा अर्थ कळला होता तिला.
हवो असलेले, बोलायचे असलेले शब्द लवकर सापडत नव्हते , सापडले तर ते जिभेवर येत नव्हते कसेबसे तिने त्या आईस खऱ्याखुऱ्या परिस्थिबद्दल देता येईल तेवढे आश्वासन दिले; 'मला केंव्हाही बाळाच्या तब्येती विषयी विचारण्यासाठी फोन कर असे म्हणत आपला फोन नंबर लिहिलेला कागद तिच्या हातात ठेवला , स्वतःसाठीच नव्हे तर बाळासाठी देखील स्वतःची काळजी घे म्हणून बजावले. तिचा हात प्रेमाने हलकेच दाबला अन नम्र होत पुढे पाऊल टाकले.

आता मन तिला विचारीत होते, 'का तू तिला तुझ्या झालेल्या पश्चतापबद्दल सांगू शकली नाहीस? तिने तुला दिलेल्या शिकवणी बद्दल तिचे तिच्या तोंडावर आभार का मानू शकली नाहीस?कदाचित ते ऐकून तिला बरे वाटले असते . कदाचित तिची अस्मिता बळावली असती. ती थोड्या अधिक आत्म विश्वासाने नशेवर मात करायच्या मार्गावर चालू शकली असती. हे करायची इच्छा होती तुझी, अजूनही आहे. मग का तुला तो विचार अमलात आणता आला नाही? ती देखील तिचे दुःख , तिचे प्रेम वेळीच का व्यक्त करू शकली नाही?

तिच्या मनात विचारांचे काहूर मजतंच होते. केवळ ह्या केस मध्येच नव्हे तर आपल्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनात अनेकदा आपण कुणाबद्दलतरी काही ग्रह करून बसतो , कुणाचा आपल्याला राग आलेला असतो ,कुणाची वागणूक मनाला त्रास देत असते,कुणाची तरी काळजी वाटत असते , कुणा वरचे तरी प्रेम व्यक्त करायचे असते,कुणाची तरी क्षमा मागायची असते कुणाला काही सांगायचे असते. अन् ते शक्य होत नाही. , जमत नाही. भलतेच शब्द बाहेर पडतात नाहीतर वेगळ्याच दिशेला वेगळ्याच प्रकारे फेकले जातात. का होते असे?

चक्रवाकांच्या समोर असलेल्या कमलदलाच्या पडद्या सारखाच आपल्या समोर देखील एखादा अभिमानाचा, गैरसमजाचा , अहंकाराचा, भीतीचा, संकोचाचा,असहाय्य तेचा खराखुरा अथवा काल्पनिक पडदा असतो का?. मनातील भावनांना पडद्याचा भेद करू शकणारे शब्द फुटत नाहीत. चक्रवकांच्या आर्त तानेसारख्याच त्या आसमंतात विरून जातात. स्वतःच्या करून घेतलेल्या पूर्व ग्रहांचे, अनुभवत असलेल्या भावनांचे ओझे स्वतःच्याच पंखावर घेत मूकपणे आपण दूर निघून जातो.. चक्रवाक पक्षासारखेच. ह्या मृदू अन तरीदेखील चिवट असलेल्या पडद्यास योग्यवेळी भेदाणे आपल्याला शिकता येईल का? का चक्रवाकासारखेच आपणदेखील आर्त ताना आसमंतात फिरवत राहू?